सोमवार दि.२९ एप्रिल २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : २४६

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे








Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


# काँग्रेसला ओबीसी समाजाचे आरक्षण मुस्लिम समाजाला द्यायचे आहे-पंतप्रधान मोदी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उत्तर प्रदेश । प्रतिनिधी**




विरोधकांच्या तुष्टीकरणाच्या राजकारणाने देश तुकड्या-तुकड्यात विभागला गेला असून प्रामाणिक लोकांच्या हक्कांवर गदा आणली गेली आहे. भाजपचा मार्ग तुष्टीकरणाचा नसून सर्वांच्या कल्याणाचा आहे, तर काँग्रेसची इंडी आघाडी खोलवर तुष्टीकरणात गुंतलेली आहे. काँग्रेसने जारी केलेला जाहीरनामा विशिष्ट समाजाची मतपेढी जपण्यासाठी समर्पित असून त्यावर १०० टक्के मुस्लिम लीगचा प्रभाव दिसून येतो, अशा परखड शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज काँग्रेसवर नवा हल्ला चढविला.

उत्तर प्रदेशातील आग्रा, आंवला आणि शाहजहानपूर येथे आयोजित केलेल्या विशाल विजय संकल्प शंखनाद महासभांमध्ये बोलताना पंतप्रधान मोदी यांनी उत्तर प्रदेशातील जनतेला सपा आणि काँग्रेसच्या वारसा कर आणि एक्स-रे योजनेची माहिती दिली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ, उत्तर प्रदेश भाजप प्रदेशाध्यक्ष श्री. भूपेंद्र चौधरी, केंद्रीय राज्यमंत्री आणि आग्रा लोकसभा उमेदवार श्री. एस.पी. सिंह बघेल, फतेहपूर सिक्री लोकसभा उमेदवार श्री. राजकुमार चहर, आंवला लोकसभा उमेदवार श्री. धर्मेंद्र कश्यप आणि राज्य सरकारमधील मंत्री श्रीमती बेबी रानी मौर्य यांच्यासहइतर पदाधिकारी याप्रसंगी मंचावर उपस्थित होते.

भाजपचे संकल्प पत्र देश मजबूत करण्याच्या संकल्पाशी समर्पित असून पाया जितका मजबूत तितके घर मजबूत, या विचाराने भाजप गरीब, शेतकरी, तरुण आणि महिला शक्ती यांना विकसित भारतासाठी सक्षम करत आहे, असे ते म्हणाले. भारतात धर्माच्या आधारावर आरक्षण कधीच दिले जाणार नाही हे स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच स्पष्ट झाले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इच्छेनुसार संविधानाचा आणि सामाजिक न्यायाचा तो गाभा आहे. पण काँग्रेस हा असा पक्ष आहे, जो बाबासाहेबांचा, संविधानाचा आणि सामाजिक न्यायाचा अपमान करत आहे. काँग्रेसने कधी कर्नाटकात, कधी आंध्र प्रदेशात आणि कधी आपल्या जाहीरनाम्यात अनेक वेळा धर्माच्या आधारावर आरक्षणाचा पुरस्कार केला आहे. देशाच्या संविधानाने आणि देशाच्या न्यायालयांनी काँग्रेसला हे करण्यापासून वारंवार मनाई केली आहे. देशाच्या न्यायव्यवस्थेने नेहमीच काँग्रेसची प्रत्येक गोष्ट फेटाळून लावली, त्यामुळे काँग्रेसने आता मागच्या दाराने एक खेळ खेळायला सुरुवात केली आहे, ज्यातून एससी, एसटी आणि ओबीसींच्या डोळ्यात धूळफेक करण्याच प्रयत्न केला जात आहे. काँग्रेसने आता धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी काँग्रेसने ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणातील काही हिस्सा हिसकावून धर्माच्या आधारे आरक्षण देण्याची योजना आखली आहे. कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने रातोरात कागदावर शिक्का मारून राज्यातील मुस्लिम समाजाला ओबीसी बनवून २७ टक्के आरक्षणात समाविष्ट केले. काँग्रेसने ओबीसी वर्गाच्या हक्कांवर डल्ला मारला आहे. तोच खेळ यूपीमध्ये खेळण्याचा काँग्रेसचा मानस असून यावेळी त्यांना समाजवादी पक्षाचा पूर्ण पाठिंबा मिळत आहे. २०१२ मध्ये, उत्तर प्रदेश विधानसभेच्या आधी, काँग्रेसप्रणित यूपीए सरकारने असाच प्रयत्न केला होता. काँग्रेसने धर्माच्या आधारावर अल्पसंख्याकांना ओबीसी आरक्षणाचा एक भाग देण्याचा निर्णय घेतला होता, परंतु नंतर त्यांच्या हेतूत यशस्वी झाले नाहीत. काँग्रेस आणि सपाची ही घातक खेळी उत्तर प्रदेशातील जनतेला आणि ओबीसी समाजाला समजून घ्यावी लागेल. भारतीय राज्यघटनेनुसार उत्तर प्रदेशातील अनेक ओबीसी जातींना आरक्षणाचा अधिकार आहे, पण काँग्रेस आणि सपा त्यांच्याकडून हा अधिकार हिसकावून त्यांच्या आवडत्या व्होट बँकेला द्यायचा आहे. आपल्या व्होटबँकेसाठी सपा यादव आणि मागासवर्गीयांचा सर्वात मोठा विश्वासघात करत आहे. तुष्टीकरणात बुडलेल्या समाजवादी पक्ष आणि काँग्रेस या दोघांची विचारसरणी सारखीच आहे. उत्तर प्रदेशातील काँग्रेस आणि सपाच्या दोन मुलांमधील मैत्रीचा आधारही तुष्टीकरणाचे राजकारण आहे. ही दोन्ही मुलं आपल्या भाषणात ओबीसी-ओबीसी करतात, पण मागच्या दाराने ओबीसींचे हक्क हिसकावून त्यांची व्होट बँक मजबूत करण्याचे काम करतात, अशी टीका पंतप्रधानांनी केली. काँग्रेस पक्षाचे एक वैशिष्ट्य असे आहे की, जेव्हा त्यांना कोणतेही मोठे दुष्कृत्य करावे लागते, तेव्हा ते देशाच्या आणि संविधानाच्या नावाने आवाज उठवू लागतात. ७० च्या दशकात काँग्रेसने अशाच प्रकारच्या घोषणा देत देशात आणीबाणी लागू केली होती. आज पुन्हा एकदा काँग्रेसने फ्लॉप चित्रपट प्रदर्शित केला आहे, अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसची खिल्ली उडविली.

पूर्वी भ्रष्ट लोक तुमचा पैसा लुटायचे. पण आता काँग्रेस आणि इंडी आघाडीचा नवा प्लॅन समोर आला आहे. यात आहे काँग्रेसची लूट, जी आयुष्यासोबतही आणि आयुष्यानंतरही केली जाणार आहे. देशातील जनतेच्या मालमत्तेची चौकशी होणार असल्याचे काँग्रेसचे नेते उघडपणे सांगत आहेत. काँग्रेसच्या राजपुत्राचे एक्स-रे मशीन आता महिलांच्या कपाटात आणि लॉकरमध्ये जाऊन त्यांच्याकडून स्त्रीधन आणि मंगळसूत्रावर डल्ला मारणार आहे, या आरोपाचाही मोदी यांनी पुनरुच्चार केला. देशाच्या माता-भगिनी आपले स्त्रीधन कधीही कुणाला देणार नाहीत, हे इंडी आघाडीच्या नेत्यांना माहीत नाही. काँग्रेस-सपा यांच्या इंडी आघाडीची नजर लोकांच्या वारशावर आहे. वडिलार्जित संपत्तीपैकी निम्म्याहून अधिक मालमत्ता ताब्यात घेण्याचा काँग्रेसचा इरादा आहे. जनतेने गोळा केलेल्या संपत्तीवर निम्म्याहून अधिक कर लादून ती भावी पिढ्यांसाठी काँग्रेसला लुटायची आहे,असेही मोदी म्हणाले. केवळ आर्थिकच नव्हे, तर संस्थांच्या कार्यालयांचे सर्वेक्षण करण्याचा काँग्रेसचा मानस आहे. म्हणजे एका मागास-दलित कुटुंबात दोन माणसे नोकरी करत असतील, तर एक नोकरी हिसकावून ज्यांचा देशाच्या साधन संपत्तीवर पहिला हक्क आहे, त्यांना ती देण्याचा डाव आहे, पण जोपर्यंत मोदी जिवंत आहेत, तोपर्यंत देशात असा अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. एससी, एसटी आणि ओबीसींचे हक्क आणि महिलांचे स्त्रीधन आणि मंगळसूत्र पाहण्याआधी इंडी आघाडीला मोदींशी सामना करावा लागेल. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केली जाईल आणि लुटलेला पैसा गरिबांना परत दिला जाईल, असा भाजपचा संकल्प आहे. भ्रष्टाचाऱ्यांकडून जप्त केलेला पैसा, बंगले आणि गाड्या जनतेत कशा वाटायच्या यावर मोदी वेगाने काम करत आहेत. इंडी आघाडीचे नेते माता-भगिनींच्या स्त्रीधनावर लक्ष ठेवून आहेत, पण माता-भगिनींना मालमत्तेचे हक्कदार बनवण्यासाठी मोदी चौकीदार म्हणून उभे आहेत. येत्या ५ वर्षात देशातील स्त्री शक्तीचे जीवन अधिक सशक्त होणार आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# पोलिसांना यश ! अवघ्या ३ दिवसांत लावला 'त्या' अल्पवयीन मुलीचा ठावठिकाणा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



तालुक्यातील आष्टी शहरामधील १२ वर्षीय अल्पवयीन मुलगी घरातून अचानक गायब झाली. पालकांनी पोलिसात धाव घेत मुलीच्या अपहरणाची तक्रार दाखल केली.यानंतर आष्टी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस यांनी २ पथकांची नेमणूक करुन सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक यंत्रणेचे मदत घेऊन पोलिसांनी दमदार कामगिरी केली व मुलीला आज दि.२७ एप्रिल रोजी कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

आष्टी शहरातील १२ वर्षीय अल्पवयीन मुलगी रा.सरकारी दवाखाना, आष्टी ही दि. २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. पासून घरातील आई वडील खवळल्याने रागाने घरातून निघून गेली व ती लवकर आली नाही म्हणून आईच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस स्टेशन येथे गु र नंबर १८५/२०२४,भा.द.वि.क ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.आष्टी पोलिसांनी वेगाने तपासचक्रे फिरवत मुलीचा शोध घेतला. कुठलीही अनुचित घटना घडण्याआधीच पोलिसांनी तिचा ठावठिकाणा शोधून काढला येरमाळा येथे ती आत्याच्या घरी गेली होती. आत्याने फोन करून पोलिसांना माहिती दिली व दि.२७ एप्रिल रोजी सदर मुलीला येरमाळा येथुन तपास यंत्रणेतील पोलिसांनी ताब्यात घेऊन मुलीला पालकांच्या ताब्यात दिले.हि कामगिरी पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक नामदेव धनवडे, पोलिस प्रविण क्षिरसागर,पो. कॉ.विलास गुंबळे यांनी केली. त्यामुळे पोलिसांच्या या कामगिरीचे परिसरात कौतुक होत आहे.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दानापूर येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**



भोकरदन तालुक्यातील दानापूर येथे आज दि.२८ एप्रिल रोजी दुपारी १:४५ वाजता बैठक संपन्ना झाली यावेळी उपविभागीय अधिकारी डॉक्टर दयानंद जगताप,पोलीस उपविभागीय अधिकारी जी. एस. दराडे, तहसीलदार संतोष बनकर साहेब,सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य साहेब ,तलाठी अंकुश बावस्कर, गोपनीय शाखेचे पिंपळकर साहेब,यांच्या उपस्थितीत गावातील सरपंच, उपसरपंच,तंटामुक्त अध्यक्षउपाध्यक्ष,ग्रामपंचायत सदस्य व इतर नागरिक यांच्या अधिपत्याखाली जालना १८ लोकसभाची निवडणूक विषय बैठक संपन्न झाली यावेळी उपविभागीय अधिकारी भोकरदन दयानंद जगताप यांनी गावकरीना आव्हान केले येत्या १३ तारखेला चौथ्या चरणामध्ये लोकसभा निवडून होणार असून दानापूर येथील सर्व समाजाच्या लोकांना सांगितले की हसत खेळत मतदान चा हक्क बजावा व प्रशसनास सहकार्य करावे असे उपविभागीय अधिकारी यांना संगितले.

# वालसावंगी पारध परिसरात होणार हजारो हेक्टरवर दुपटीने मिरची लागवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**



भोकरदन तालुक्यातील वालसावंगी व परिसरात खरीप हंगामात लागवड करण्यात येणाऱ्या मिरची लागवडीला आतापासूनच प्रारंभ झाला असून आठवड्याभरापासून आतापर्यंत वीस ते पंचवीस हजार हेक्टरवर ठिबक सिंचनावर मल्चिंग कापडाच्या सहाय्याने मिरची लागवड झाल्याचा अंदाज भोकरदन तालुक्यातील वालसावंगी परिसरात दिसून येत आहे भोकरदन तालुक्यातील वालसावंगी हे गाव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध असल्याने दरवर्षी परिसरात ५० ते ६० हजार हेक्टरवर मिरची लागवड केली जाते व परिसरात सर्वात मिरची लागवडीसाठी प्रसिद्ध असल्याने दरवर्षी परिसरात ५० हजार हेक्टरवर मिरची लागवड होते परंतु गेल्या वर्षी सुरुवातीपासूनच मिरचीला ५० ते ६० रुपये किलोचा हमीभाव मिळाल्याने व शेवटपर्यंत मिरचीचे भाव महाराष्ट्र आंध्रप्रदेश, कर्नाटक ,तेलंगणा मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आदी राज्यात टिकून राहिले त्यामुळे शेतकरी मिरचीचा चांगला भाव घेऊन मलामाल झाले आहे असे चित्र गेल्यावर्षी दिसून आल्याने यावर्षी मात्र शेतकऱ्यांना हिरवी मिरची मालामाल करणार असल्याचे चित्र दिसून येत आहे शेतकऱ्यांनी अगोदरच दुप्पट मिरची लागवड वाढवली असून आतापासूनच शेतकऱ्यांनी मिरची लागवडीसाठी मोठी कंबर कसली असून परिसरातील वालसावंगी, धावडा, पारध ,पिंपळगाव रेणुकाई, अन्वा जळगाव सपकाळ लेहा, वडोदतांगडा आदी परिसरात मिरची लागवडीचे क्षेत्र वाढणार असल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षी सुरुवातीपासूनच मिरचीला मार्केटमध्ये आवक कमी झाल्याने हजारो हेक्टरवरील मिरची लागवड केली तसेच शेतकरी एप्रिल पासूनच लागवड करीत आहे त्यामुळे यावर्षी मात्र शेतकऱ्यांना हिरवी मिरची मालामाल करणार असल्याचे चित्र दिसत आहे.

,वालसावंगी व पारध या वर्षी सुरुवातीपासूनच मिरचीचा तिखटपणा शेतकऱ्यांना देऊन गेल्याने अनेक शेतकऱ्यांनी हिरवी मिरची व लाल मिरचीत मोठा भाव घेऊन लाखो रुपयांच उत्पन्न घेतले त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांनी मिरची लागवडीसाठी मोठी कंबर कसल्याने आतापासूनच मिरची लागवडीसाठी नर्सरीत लाखो वरील रोपाची बुकिंग करून अनेक शेतकऱ्यांनी मिरची लागवडीला सुरुवात केली आहे.

- संदीप काटोले मानव हायटेक मिरची नर्सरी चालक पारध.

,गेल्या वर्षी सुरुवातीला मिरचीला ५० ते ६० रुपये किलोचा हमीभाव शिल्लक चा टिकून राहिल्याने मिरचीचे भाव तेजीत राहिले त्यामुळे यावर्षी मिरची लागवडीचे क्षेत्र वाढवून दोन एकर मिरची लागवड करीत आहोत.

-विष्णू पाडळे मिरची उत्पादक शेतकरी वालसावंगी.

# नांदा गावचे भूमीपुत्र शहीद विष्णु रघुनाथ औटे यांना वीरमरण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यांतील नांदा गावचे भुमीपुत्र शहीद विष्णु रघुनाथ औटे (६६आर्मड रेजिमेंट) हवालदार वय ४४ होते, जम्मु काश्मिर,कोलकत्ता, बंगलोर, राजस्थान, हरियाणा देशात विविध ठिकाणी २४ वर्ष सेवा केली,आजाराने कमांडो हॉस्पिटल पुणे येथे २६/०४/२०२४ रोजी वीरमरण आले,भारत मातेच्या वीर सुपुत्रास भावपुर्ण श्रद्धांजली देण्यात आली.शुक्रवारी संध्याकाळी माहिती धडकताच नांदा गांवासह संपूर्ण पंचक्रोशी शोक सागरात बुडाली,आष्टी तालुक्यांत नांदा गावातील भुमीपुत्र विष्णु रघुनाथ औटे हे सन २००१ मध्ये आर्मी भरती झाले होते.नांदा गावचा सुपुत्र शहीद झाल्याचे समजताच औटे परिवारांसह पंचक्रोंशीवर शोककळा पसरली होती.यांच्या घरी पोहोचले,त्यांनी शहीद कुटुंबियांचे सांत्वन केले,या जवानाचे पार्थिव शनिवारी संध्याकाळी नांदा गावांत पोहोचल्यानंतर आष्टी तालुक्यातील व नांदा गावांतील आजी-माजी सैनिक तसेच सर्व नांदा आमदार,माजी आमदार,त्रिदल सेवा संघ, महसुल विभाग.जि.प.सदस्य, पं,स,सदस्य,ग्रामस्थ,पोलीस पाटील, सरपंच उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य,सर्वच माता बहिणींनी भारत माता की जय,अमर रहे अमर रहे विष्णु औटे अमर रहे! जड अंतकरणाने घोषणा दिल्या.त्यानंतर सजवलेल्या लष्करी वाहनांतून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली त्यानंतर शहीद जवान विष्णु औटे यांना बीड जिल्हा पोलीस प्रशासनाकडूंन तसेच लष्करी विभागाकडूंन अखेरची मानवंदना देत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली,मुलगा, भाऊ, आई असा परिवार आहे

संपादकीय

# अनिष्ट परिणामांची वाढती व्याप्ती

निवडणूक प्रचारात पर्यावरण, हवामान बदल, उष्णतेच्या लाटा, पाण्याचं दुर्भिक्ष्य असे मुद्दे कोणताही राजकीय पक्ष मांडत नाहीये. हे संकट घरात घुसले आहे. तरीही भारतातील राजकीय पक्ष त्याबाबत चकार शब्द उच्चारत नाहीत, हे अनाकलनीय आहे...

उष्णतेच्या झळांनी सारेच त्रासले आहेत. हवामानातील बदलांचाच हा एक अपरिहार्य परिणाम आहे. मात्र, हवामानातील अनिष्ट बदलांच्या झळा भारतासहित जगभरात बसत आहेत. मेक्सिको हे त्याचं एक ठळक उदाहरण. मेक्सिकोमध्ये हवामानातील बदलामुळं सागराची सरासरी पातळी वाढत आहे. भयानक वादळीवारे तिथं वारंवार पिंगा घालत आहेत. प्रशांत महासागर आणि आखात यांना भिडलेल्या त्या देशाच्या किनाऱ्याची वेगानं धूप होत आहे. आतापर्यंत हजारो किमी जमीन सागरार्पण झाली आहे. पाण्याचे साठे कमी झाले आहेत आणि दुष्काळाचं संकट उभं ठाकलं आहे. मेक्सिकोच्या भूमीवरून इतर देशांमधील स्थलांतरितांचे तांडे इतरत्र जात आहेत. या स्थलांतरांना ताब्यात घेऊन देशाबाहेर सोडण्याचं काम मेक्सिको सरकारनं आता थांबवलं आहे. याचं कारण त्यासाठी लागणारा पैसाच नाही.

येत्या दोन जूनला तिथं सार्वत्रिक निवडणुका आहेत. क्लॉडिया शेनबॉम या अध्यक्षपदासाठी उभ्या आहेत. त्या पर्यावरणशास्त्रज्ञ आहेत. पण निवडणुकीत 'बदलते हवामान' हा कळीचा मुद्दा त्यांनीसुद्धा केलेला नाही. हे दुर्दैवी आहे. याचं कारण हवामानात कोणते आणि कसे बदल होत आहेत, त्याचे संभाव्य परिणाम काय होऊ शकतात, त्याची झळ कशी बसू शकते, याची त्यांना स्पष्ट कल्पना आहे. याचं कारण त्या स्वतः पर्यावरण या विद्याशाखेच्या संशोधिका आहेत. २००७ सालात 'इंटरगव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज' (आयपीसीसी) या संघटनेनं हवामानातील बदलांबाबत एक अहवाल प्रसिद्ध केला. त्याबद्दल आयपीसीसीला त्या वर्षीचा नोबेल पुरस्कार मिळाला. शेनबॉम या त्या अहवालाच्या एक लेखिका होत्या. तरीसुद्धा हवामानातील बदल हा मुद्दा प्रचारात केंद्रस्थानी ठेवून जनमत तयार करण्याचं काम त्यांनी केलं नाही. मेक्सिको हा एक प्रमुख खनिज तेल उत्पादक. साहजिकच त्याची अर्थव्यवस्था त्यावर अवलंबून आहे. मेक्सिकोचे अध्यक्ष अँद्रेस मॅन्युएल लोपेझ ऑब्रेटर यांनी सरकारी तेल कंपन्यांत अब्जावधी डॉलर घातले आणि खनिज तेल आणि वायूवर तयार होणाऱ्या विजेचं उत्पादन वाढेल, याची काळजी घेतली. परिणामी अक्षय ऊर्जा तयार करण्याच्या प्रकल्पांमध्ये आवश्यक ती गुंतवणूक झाली नाही. खरंतर हवामानातील बदलांमुळं दुष्काळासहित इतरही संकटे ग्रासत आहेत.

या पार्श्वभूमीवर अध्यक्षपदाच्या उमेदवार शेनबॉन यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. त्या म्हणतात, 'माझा विज्ञान, तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा यांवर विश्वास आहे. आपला देश खनिज तेलाच्या उत्पादनावर अवलंबून आहे. यामुळंच खनिज तेलाचं उत्पादन आणि हवामानातील बदल यांच्यामध्ये समतोल हवा. हवामान बदल आणखी विकोपाला जणार नाहीत, यासाठी मी प्रयत्न करीन.' मात्र, खनिज तेलाच्या उत्पादनाबाबत आणि वीजनिर्मिती केंद्रांबाबत त्यांची भूमिका नेमकी काय असेल, यावर बरंच काही अवलंबून असेल. सध्या मात्र मेक्सिको निसर्गाच्या फटक्यांनी हैराण आहे.

ग्वाटेमालामध्ये तर आणखी वाईट परिस्थिती आहे. गेल्या ४० वर्षांत तिथली जंगलं नष्ट झाली. तरीही जंगलतोड चालूच आहे. परिणामी भूस्खलन होत आहे. अचानक पूर येत आहेत. जलव्यवस्थापन योग्य प्रकारानं होत नसल्यानं पाणी वाया जातंच, पण प्रदूषित होत आहे. चार वर्षांपूर्वीच तिथं सामान्य माणसं अशीच मेटाकुटीला आली होती. स्थलांतर करत होती. यंदा ४० देशांत निवडणुका होत आहेत. यात कोण यशस्वी होतं आणि सत्ताधारी हवामानातील बदलांबाबत काय भूमिका घेतात, यावर जगाचं भवितव्य अवलंबून असेल. याचं कारण हवामानातील बदलांच्या अनिष्ट परिणामांची व्याप्ती आता वाढत आहे. त्यामुळंच दी इकॉनॉमिस्ट, दी न्यूयॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट अशा नियतकालिकांतून जगभरातल्या निवडणुका आणि हवामान बदल यांची ठळक दखल घेतली जात आहे. तशी ती घेणं आवश्यकही आहे. यासंदर्भात अमेरिकेचं उदाहरण बोलकं आहे. सन २०१६मध्ये ट्रम्प हे निवडून आल्यानंतर त्यांनी अमेरिकेला पॅरिस करारातून मोकळं केलं. मात्र, अमेरिकेतील राज्यांनी वॉशिंग्टनच्या भूमिकेला पाठिंबा दिला नाही. त्यांनी उष्णताशोषक वायूंचं प्रमाण वाढणार नाही, याचे प्रयत्न सुरूच ठेवले आणि त्यात यशही मिळवलं. येत्या निवडणुकीत हवामान बदलाबाबत रिपब्लिकन आणि डेमॉक्रॅट हे 'दोन ध्रुवांवर दोघे आपण' म्हणावं अशा भूमिकांमध्ये आहेत. ब्रिटनमधील निवडणुकांतही मजूर आणि हुजूर पक्ष यांच्या भूमिकांमध्ये एकवाक्यता नाही. वीजनिर्मितीसाठी दगडी कोळशावर अवलंबून असणाऱ्या भारत, इंडोनेशिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांतही यंदा निवडणुका आहेत.

भारतातही प्रचारात पर्यावरण, हवामानातील बदल, उष्णतेच्या लाटा, पाण्याचं दुर्भिक्ष्य असे मुद्दे कोणताही राजकीय पक्ष मांडत नाहीये. आपली भूमिका सांगत नाहीये. हे उद्वेगजनक आहे. संकट आपल्या दारातच नाही, तर घरात घुसलं आहे आणि तरीही भारतातील राजकीय पक्ष त्याबाबत चकार शब्द उच्चारत नाहीत, हे अनाकलनीय आहे. सागराची वाढती पातळी आणि त्यामुळं सागरार्पण होणारी जमीन, तुटणारी जंगलं, हवेचं वाढतं प्रदूषण, पाणीटंचाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, धान्योत्पादनात होणारी घट, बदलत्या हवेला तोंड देऊन वाढणारी नवीन वाणं, आरोग्याच्या वाढत्या समस्या असे प्रश्न सोडवणं अनिवार्य आहे. पण तसं कुणाला वाटत नाही. खेदाची गोष्ट अशी की या प्रश्नांबाबत मतदारही मौनीबाबाच बनतात. आजही आपला सारा भर जाती, पंथ, धर्म, शाकाहार आणि मांसाहार अशा गोष्टींच्या भोवतीच फिरत आहे. लोकांची मनं अशा प्रश्नांमध्ये अडकलेली आहेत. ती तशीच राहतील, असंच राजकारणी नेत्यांचं वागणं आणि बोलणं आहे. खरंतर यातील कोणतीही गोष्ट हवामानातील बदलांच्या संकटाशी मुकाबला करण्यासाठी उपयोगी पडणारी नाही. पण तरीही आपले राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते तिकडे डोळेझाक करत आहेत; कारण त्यांना फक्त सत्तेचा सोपन दिसतो आहे.

खेदाची गोष्ट अशी की समाजातील बुद्धिजीवी, विचारवंत, पत्रकार, शिक्षक यापैकी कोणाच्याही संघटना याबाबत आपल्या राजकीय पक्षांना याबाबत प्रश्न विचारत नाहीयेत.

अर्थात यात नवीन असं काहीच नाही. आपल्या देशात पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वच्छ हवा मिळण्याचा नागरिकांचा हक्क हे मुद्दे यापूर्वीसुद्धा कोणत्याही निवडणुकीत कळीचे मुद्दे नव्हते. पण आता हवामानातील बदलाचं संकट आपल्या घराचा उंबरठा ओलांडून आत घुसत आहे. हे संकट सर्वांसाठी आहे. उष्णतेच्या लाटा, तुफानी वादळं, अचानकपणं येणारे पूर, भूस्खलन, सागर गिळून टाकत असलेली जमीन ही संकटं सर्व जातीच्या आणि धर्माच्या लोकांसाठी सारखीच असणार आहेत. त्यांचे फटकेही सर्वांनाच बसणार आहेत. याचं भान आपल्याला नाही. याचं कारण राजकारणी लोकांनी तयार केलेल्या भलत्याच भ्रमांच्या सावलीला आपण सुखाची छाया म्हणत आहोत. इथं ज्ञानेश्वरीतील एक उपमा आठवते. श्री ज्ञानेश्वर म्हणतात, 'हे असो आघवी बोली। सांग पा सर्पफणीची साउली। ते शीतल होईल केतुली। मूषकासी।।'... म्हणजे, 'हे सर्व राहू दे. तूच सांग, सर्पाच्या फणीची सावली आहे. ती उंदराला कितपत शांत करणारी होईल बरे?' जी जाणीव उंदराला असते, तीसुद्धा आपल्याला असू नये?

# पाणी वितरणात अत्याधुनिक तंत्रज्ञान

शुद्ध, पिण्यायोग्य पाण्याची उपलब्धता दिवसेंदिवस जटिल समस्या होत आहे. अशा काळात पाण्याच्या काटेकोर नियोजनासाठी 'एआय'सह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर गरजेचा आहे.



तेल, कोळसा, वीज, लाकूड इत्यादी नैसर्गिक संसाधनांचा कमीतकमी पण प्रभावी वापर करणे काळाची गरज आहे. त्यासाठी जगभरातील सरकारे प्रयत्नशील आहेत. पाणी सुद्धा तितकेच महत्त्वाचे संसाधन आहे. निरोगी आयुष्यासाठी योग्य प्रमाणात व शुद्ध पाण्याची नितांत गरज आहे. काही दशकांपासून वाढती लोकसंख्या व हवामानातील बदलांमुळे पिण्यायोग्य पाण्याची टंचाई मोठे जागतिक संकट बनत आहे. 'युनिसेफ' आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) अहवालानुसार, जगातील प्रत्येक तीनपैकी एका व्यक्तीस पिण्यायोग्य पाणी मिळत नाही. एका नियतकालिकाच्या अहवालानुसार, भारतात नळाद्वारे येणाऱ्या ४० टक्के पाण्याचा अपव्यय केवळ वाहिनीतील गळतीमुळे होतो. देशातील साधारणपणे चार लोकांचे कुटुंब वर्षाला सरासरी ३५ हजार लिटर पाणी वाया घालवते. पाण्याचे नैसर्गिक जलाशयापासून शुद्धीकरण प्रकल्पापर्यंतचे वहन, तेथील प्रक्रिया, पुढे घरापर्यंत किंवा कारखान्यांपर्यंत पोचवणे हा खर्च प्रचंड असतो. भारतातील तसेच जगाच्या माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रात अग्रगण्य बंगळुरू शहराची पाणीटंचाईने अवस्था दयनीय झाली आहे. गरीब-श्रीमंत अशा प्रत्येकाला ओंजळभर पाण्यासाठी भटकावे लागत आहे. पुणे, मुंबई, नोएडा, हैदराबाद इत्यादी शहरांची वाटचाल त्याच दिशेने चालू आहे. नजीकच्या काळात प्रत्येक देशाला, शहराला पाणीप्रश्न सतावू शकतो. ज्या 'आयटी'मुळे बंगळूरसारख्या शहरांमध्ये प्रचंड गर्दीमुळे पाणीबाणी निर्माण झाली, त्या क्षेत्राचाच भाग असलेल्या आर्टिफिशिअल इंटेलिजन्सवर आधारित प्रभावी उपायही योजले जाऊ शकतात. यासंदर्भातील, दोन पैलू इथे चर्चिले आहेत. पाणी वापराचे नियोजन व जागरूकता वाढवणे आणि वितरणातील अपव्यय कमी करणे. ऑस्ट्रेलियामधील शास्त्रज्ञ एनग्युएन आणि त्यांच्या पथकाने 'ऑटोफ्लो' नावाचे ऋइंटेलिजन्ट सॉफ्टवेअर' बनवले आहे. मशिन लर्निंग आधारे काम करणारे हे सॉफ्टवेअर, वॉटर मीटरमधून सेन्सर्सचा वापर करून पाण्याच्या वापराचे वर्गीकरण करते. शॉवर, टॉयलेट, कुलर, डिश वॉशर, बागेसाठी पाणी आदींचा त्यात समावेश होतो. पाण्याचा पुरवठा व वापर याचे कोष्टक ग्राहकाच्या मोबाईल व संगणकावर दिले जाते. विशेष म्हणजे, साधारणपणे तितकेच लोक असलेल्या कुटुंबामध्ये किती पाण्याचा वापर होतो; ऑटोफ्लो सॉफ्टवेअर वापरणाऱ्या घरात किती होतो, याची तुलना सुद्धा देते. त्यानुसार ग्राहकाला पाणीवापराचे उद्दिष्ट ठरवण्यास मदत होते. रोजच्या वापराप्रमाणे हे सॉफ्टवेअर सूचना देते. यातून पाण्याची बचत व योग्य वापर शक्य होतो. महत्वाचे म्हणजे, पाण्याच्या गळतीचाही अंदाज यावरून लावता येतो. शास्त्रज्ञांच्या दाव्यानुसार या सॉफ्टवेअरची अचूकता ९० टक्क्यांहून अधिक आहे. यामुळे पाण्याचा सुयोग्य पद्धतीने वापर शक्य होतो. ऑस्ट्रेलियन वॉटर असोसिएशनच्या नियतकालिकेत यासंबंधीची आकडेवारी देणारा लेखही उपलब्ध आहे. पाणी वितरणाच्या जाळ्यामध्ये सतत पाहणी, नियमित देखभाल, दुरुस्ती इत्यादी करून सर्वसाधारण खर्च कमी करता येऊ शकतो. पण बिघाड होण्याच्या बऱ्याच आधी सूचना मिळणे व दुरुस्ती करणे यातून पाणी, पैशाचा अपव्यय टाळता येतो. जलाशयापासून ते नळापर्यंत विविध ठिकाणी सेन्सर्स बसवले जाऊ शकतात. हे सेन्सर्स, पाण्याचा विशिष्ट आवाज, प्रवाहाचे प्रमाण, तापमान, दाब, कंपने इत्यादी मोजतात. आजच्या डिजिटल युगात इंटरनेट ऑफ थिंग्स (आयओटी) व मशिन लर्निंग अल्गोरिदम्सचा वापर करून या माहितीचा अचूक अर्थ लावणे शक्य होते. त्यातून येणाऱ्या निष्कर्षांवरून कोणत्या जागी पाण्याची गळती आहे, हे तात्काळ शोधता येईल. त्यानुसार संबंधित व्हॉल्व बंद करता येतील, दुरुस्ती करता येईल. अशीच प्रणाली रहिवासी सोसायट्यांमध्ये बसवता येईल. तेथील पाणीगळती रोखता येईल.

गळतीसह देखभालीची माहिती

प्रमुख विकसनशील देशांत 'स्काडा' प्रणाली वापरतात. ज्यामध्ये पाण्याच्या वितरणासंबंधी माहिती गोळा केली जाते, त्याचे विश्लेषण करून त्यानुसार दुरुस्ती व कार्यवाही केली जाते. आशियाई विकास बँकेच्या अहवालानुसार, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स व मशिन लर्निंग आधारित पाण्याची वितरण व्यवस्था काळाची गरज आहे. अशा व्यवस्थेला 'हायड्रॉलिक मॉडेलिंग-२' असे नाव दिले आहे. यात विविध प्रकारची 'स्काडा' प्रणालीतून व सेन्सर्सकडून मिळणारी प्रत्येक सेकंदाची माहिती, गेल्या काही महिन्यांतील, वर्षांतील, शहराच्या विविध विभागांमधील पाण्याची कमी अधिक होणारी मागणी, ग्राहकांच्या तक्रारी, त्यावरचे उपाय इत्यादींचा उपयोग मशिन लर्निंग अल्गोरिदम्स विविध वितरण समस्यांवरील नजीकच्या भविष्यात होणारे बिघाड, गळती व त्यावरील उपाय शोधण्यासाठी करतात. अशा प्रणालीचा वापर पाण्याची चोरी शोधण्यासाठीही होऊ शकेल.

अशा प्रणालींना 'एक्स्पर्ट सिस्टिम्स'ही म्हणतात. त्याच अहवालानुसार आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आधारित पाण्याच्या स्मार्ट वितरण व्यवस्थेमुळे वर्षाकाठी साधारणपणे आठ टक्के पाणीबचत होऊ शकते. ब्रिटनमधील पाणीवितरण सेवादार कंपनीने पाण्याची गळती रोखण्यासाठी 'एक्स्पर्ट सिस्टिम' विकसित केली आहे. ज्यामध्ये सात हजारांहून अधिक पाण्याचा दाब व प्रवाह मोजणारे सेन्सर्स असतात. प्रत्येक १५ मिनिटाला हे सेन्सर्स आकडे देतात. एक्स्पर्ट सिस्टिममधील इंटेलिजन्ट सॉफ्टवेअर मानवाच्या मेंदूमधील न्यूरॉन्सच्या माहितीच्या विश्लेषणाच्या आधारावर बनवलेले आहे. असे इंटेलिजन्ट सॉफ्टवेअर वितरणव्यवस्थेला अधिकाधिक शिकण्यास मदत करतात. त्यातूनच वितरणातील संभाव्य बिघाड शोधला जातो. या प्रणालीमुळे आगाऊ प्रतिबंधित उपाययोजना केल्या जातात. परिणामी कंपनीच्या ग्राहकांच्या तक्रारी घटत आहेत. ग्राहकांची ७० लाखांहून अधिक संख्या एक्स्पर्ट सिस्टिमचे यश दर्शवते. 'ब्लूफिल्ड'च्या संशोधनानुसार आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आधारित प्रणालींमुळे कित्येक हजार किलोमीटरच्या जलवाहिन्यांची तपासणी काही तासांत शक्य होते. तपासणीसाठीचे इंटेलिजन्ट सॉफ्टवेअर ठराविक ठिकाणी एका दिवसापासून ते पुढील पाच वर्षांतल्या बिघाडाचा अंदाज बांधू शकते, तसेच त्यामुळे होणारे नुकसान व परिणामांची माहितीही देऊ शकते. कंपनीच्या अभ्यासानुसार, २०२७ पर्यंत जर आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर असाच वाढवत नेला, तर जगभरात पाण्याच्या गळतीमुळे व चोरीमुळे होणारे चाळीस अब्ज रुपयांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नुकसान टाळणे शक्य होऊ शकते. पाण्याचे योग्य नियोजन, त्याबाबतची जागरूकता व वितरण व्यवस्था ही छोट्या शहरांसाठीही अत्यंत जटिल समस्या आहे. गेल्या ५० वर्षांपासून जवळजवळ सर्वच देशांत शहरीकरण वाढते आहे. शुद्ध पाणी घरोघरी पोचवणे जशी प्रशासनाची जबाबदारी आहे तशीच त्यामध्ये संशोधन करणे, बदल सुचवणे, प्रायोगिक पद्धतीत असे बदल यशस्वी करून दाखवणे ही विद्यापीठांचीही सुद्धा जबाबदारी आहे. महत्त्वाचे म्हणजे विविध विद्याशाखांचे कित्येक तज्ज्ञ प्राध्यापक, अभियंते व प्रतिभावंत विद्यार्थी उपलब्ध आहेत. अशा विद्यापीठांनी व संबंधितांनी पुढाकार घेऊन हातभार लावणे मोलाचे ठरेल. अगदी छोट्या खोलीमध्ये असे प्रयोग यशस्वी करून दाखवणे तसेच त्याचे मूर्त स्वरूप विद्यापीठांतील एखाद्या विभागात उपयोगात आणून दाखवणे सहज शक्य आहे.

# आर्थिक साक्षरता ; वारसा नव्हे वसा

मुलांना पॉकेट मनी द्यावा, की नाही यावर अनेक मते-मतांतरे आहेत. योग्य अटींसह मुलांजवळ पैसे असायला हरकत नाही. उदाहरणार्थ, कोणताही खर्च करण्यापूर्वी तो गरजेचा आहे हे आई-बाबांना पटवावे लागेल. हिशोब, अंदाजपत्रक हे नियमितपणे तयार करावे लागेल. गरज-आवड- चैन आणि बचत याचे प्रमाण मुलांनीच ठरवून ते पाळले जाते आहे ना, याची ठरावीक दिवसांनी तपासणी करावी लागेल, तरच हे गणित साधता येईल.




ती सुरू होण्याआधी मुलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पालकांबरोबर संवाद सत्र सुरू होते.

'अहो, सहावीतली माझी मुलगी म्हणते, 'मला गरीब लोक नाही आवडत, मला त्यांचा खूप राग येतो.' हे ऐकल्यावर मी चक्रावूनच गेले, अजूनही मला समजत नाही, तिला काय सांगावे ते.' एक आई पोटतिडकीने सांगू लागली.

'आम्ही नोकरी करायला लागेपर्यंत आई-वडिलांना काहीही मागितले नाही. वर्षाला दोन नवीन ड्रेस आणि पुरेसे खायला प्यायला मिळाले, तरी आम्ही समाधानी होतो आणि आमचीच मुले एखाद वेळी खरेदी करायला नाही म्हटले, की रुसून बसतात. लगेच नशिबाला बोल लावतात. खरे सांगायचे, तर आपली बाजू बरोबर असूनही आपल्यावर सतत भावनिक दडपण आणण्याचा प्रयत्न करतात.' दुसऱ्या आईचा 'प्रेशर पॉइंट' उद्युक्त झाला.

'मला तर लाजच वाटते सांगताना; पण नातेवाइक आणि मित्र-मैत्रिणींपेक्षा समुपदेशकाला सांगणे कधीही योग्य ना. अहो, काहीच कमी केले नाही याला आणि गेल्या आठवड्यात त्याने काही वस्तू आवडल्या म्हणून मित्रांकडून सरळ उचलून आणल्या, त्यांना न सांगता. एकदा नाही, दोनदा. काय चुकले आमचे? डोके सुन्न होऊन गेले आहे नुसते.'

'आमचा मुलगा नुकताच सोळाचा झालाय. वाढदिवसापासून भुणभुण सुरू आहे. नवीन बाइक घेऊन दे म्हणून, त्याला हवी ती; कारण त्याचे सगळे मित्र कधीपासूनच बाइकवर येतात म्हणून.'

'अहो, पैशांची काही किंमतच नाही या पिढीला. आमच्याकडे कधीच उधळमाधळ नसते तरीही. काय करावे समजत नाही, नुसतीच उलघाल आणि आरोप-प्रत्यारोपांचे दुष्टचक्र.'

मुलांशी बोलल्यावर काही गोष्टी समोर आल्या, बऱ्याच मुला-मुलींना दरमहा किती पैसे घरात येतात याचा अंदाज होता; त्यामुळे आपण श्रीमंत असूनही आई-बाबा एवढी काटकसर का करायला लावतात हेच कळत नव्हते. प्रत्येक वस्तूसाठी एवढा हट्ट करायला लावण्यापेक्षा यांनीच आमच्या गरजा समजून घ्याव्यात, हाच हट्ट होता. घरातले पैसे ही जबाबदारी, केलेल्या कष्टांचा मोबदला, अनेक सोयी-सुविधा आणि गरजा भागवण्याचे साधन आणि म्हणूनच जबाबदारीने हाताळायची बाब हे मुलांच्या कळण्यातही नव्हते आणि वळण्यातही!

मला माझा जुना प्रयोग आठवला.

आपल्या गरजांविषयी चांगली समज निर्माण होण्यासाठी आम्ही एक माध्यमजत्रा भरवली होती. नाशिकच्या अभिव्यक्ती संस्थेच्या मदतीने. त्यातल्या अनेक दालनांपैकी एक दालन खरेदीचे होते. त्यामध्ये कोणत्याही मोठ्या दुकानात असणाऱ्या सर्व वस्तू ठेवल्या होत्या. सुरुवातीलाच मुलांना (खेळातले) शंभर रुपये दिले जात आणि त्यामध्ये बसतील एवढ्या वस्तू घ्यायला सांगितले जाई आणि सर्वांत शेवटी ठेवले होते तीन रांजण. एकावर लिहिले होते गरज, दुसऱ्यावर होते आवड आणि तिसऱ्यावर होते चैन. मुलांनी खरेदी केलेल्या वस्तूंपैकी योग्य त्या रांजणात त्या वस्तू टाकायच्या असत. सर्वांत शेवटी मुले बिल बनवत आपण गरजेपोटी, चैनीपोटी आणि आवड म्हणून केलेल्या खरेदीचे. त्यानंतर मनमोकळी चर्चा व्हायची. गरज, चैन आणि आवड कशाला म्हणायचे, कशावर किती खर्च होतो आणि तो प्रमाणात आणण्यासाठी काय बदल करावे लागतील याबद्दल! या संपूर्ण प्रक्रियेमधून मुले गेल्यामुळे त्यांच्याही ते मनाला भिडते. अभिव्यक्तीकडून अनुभूतीकडे जाते आणि मग समजेमध्ये झिरपते.

पैशांची ओळख अगदी लहानपणापासून म्हणजे अगदी मूल बसायला लागल्यापासूनही करून देता येते. आदिती लहान म्हणजे अगदी सात-आठ महिन्यांची होती तेव्हा तिच्यासमोर आम्ही सुट्ट्या पैशांचा ढीग रचत असू. ती एकेक करून ते पैसे एका बरणीमध्ये भरायची. पुढे ते मोजायचा खेळ सुरू झाला; त्यामुळे तिला पैसे ओळखीचे वाटू लागले आणि त्याविषयीची आसक्ती, अप्रूप वाटणेच बंद झाले.

अशीच एक सवय लावता येते ती म्हणजे हिशोब लिहिण्याची. अर्थात पालकांनाच ही सवय नसेल, तर तिथून सुरुवात करावी लागते. यात बेरीज, वजाबाकी, भागाकार, गुणाकार अशा मूलभूत गणिती प्रक्रिया शिकवता येतातच; शिवाय महिन्यातून एकदा-दोनदा आपण गरज- आवड- चैन यापैकी कशावर किती पैसे खर्च केले याचे ऑडिट करता येते. पुढील खर्चाचे नियोजन करता येणे हा पुढचा टप्पा. कशावरचे पैसे वाचवून पुढच्या कोणत्या खर्चाचे नियोजन करता येईल अशी चर्चा करता येईल. पुढच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करता येईल. (ही प्रक्रिया खूप प्रभावीपणे करता येते) वार्षिक, मासिक आणि दैनंदिन खर्चाचे नियोजन करता येते. गरज, आवड आणि चैन वर खर्च होणाऱ्या खर्चाचे परीक्षण आणि त्यानुसार पुढील नियोजन करता येते. हे आधी वैयक्तिक आणि नंतर कुटुंबासाठीही करता येईल. टप्प्याटप्प्याने याची व्याप्ती वाढवत नेता येईल. आणि हो, हे सर्व आपण शिकणे, करणे जितके सोपे तितकेच मुलांनी स्वत: शिकेपर्यंत धीराने प्रशिक्षण देणे तितकेच कठीण! म्हणूनच हे टप्पे महत्त्वाचे, मग अगदी दहा-बारा वर्षांच्या मुलांनाही हे साध्य करता आले आहे.

मुलांना पॉकेट मनी द्यावा, की नाही यावर अनेक मते-मतांतरे आहेत. योग्य अटींसह मुलांजवळ पैसे असायला हरकत नाही. उदाहरणार्थ, कोणताही खर्च करण्यापूर्वी तो गरजेचा आहे हे आई-बाबांना पटवावे लागेल. हिशोब, अंदाजपत्रक हे नियमितपणे तयार करावे लागेल. गरज-आवड- चैन आणि बचत याचे प्रमाण मुलांनीच ठरवून ते पाळले जाते आहे ना याची ठरावीक दिवसांनी तपासणी करावी लागेल. अशा अटी कागदावर वाटतात, तितक्या सरळ नाहीत. वाढत्या वयानुसार त्याचे प्रमाण आणि पद्धत बदलावी लागते.

मग कधी कधी पुढील प्रसंग बघायला मिळू शकतात.

दुकानात हट्ट करणारा मुलगा - बाबा, हे खेळणे मला खूप आवडले आहे. प्लीज घ्या ना. प्लीज, प्लीज, प्लीडडडडडडडज. माझ्या सगळ्या मित्रांकडे आहे, मला खूप दिवसांपासून हवे आहे ते, मी तीन महिने थांबलो, आता तरी घ्या.

वडील - (तुझ्याकडे किती खेळणी आहेत, खूप हट्टी झाला आहेस, प्रत्येक वेळी दुकानात गेल्यावर काही तरी घेतलंच पाहिजे का, यांसारखे कोणतेही वाक्य न बोलता) तुझ्या बँकेत आहेत का पैसे? बजेट आणि शिल्लक बघ आणि ठरव घ्यायचे आहे का ते. तुला योग्य वाटले, तर पुढच्या एखाद्या खर्चासाठी हे पैसे साठवून ठेवू शकतोस. पाहिजे तर उद्यापर्यंत विचार कर. हवे तर, मी परत घेऊन येईन तुला.

साधारणत: तासाभरानंतर त्याची तीव्रता कमी झाली असे दिसून येते. मुलांना खरे तर पालकांनी तो खर्च करावा असे वाटत असते. अशा वेळी पालकांना स्वत:च्या मतावर आणि नियोजनावर ठाम राहता येणे महत्त्वाचे.

मोठेपणी मुलांकडे असलेल्या पैशांतून मोठ्या खर्चाचे नियोजन म्हणजे गाडी खरेदी, एखादी दुरुस्ती इत्यादीचे नियोजन ही एक संधी म्हणून घेता येईल. बचत करण्याची वेगवेगळी साधने, त्यांची सुरक्षितता आणि धोके असा प्रकल्पही एखाद वर्ष चालवता येईल.

बऱ्याचदा पालकांकडून होणाऱ्या चुका पाहू.

- मुलांना हातखर्चासाठी दिलेले पैसे याला कोणते तरी काम केले म्हणून दिलेले बक्षीस (पुढच्या वेळी काम करण्याची लालूच) असे स्वरूप दिले जाऊ नये. मुलांना घरातली जबाबदारी घ्यायला शिकवण्यासाठी वैयक्तिक चर्चा, प्रशिक्षण अशी माध्यम वापरता येतील.
- बऱ्याचदा मुलांच्या हातून काही चूक घडली, तर ही सवलत काढून घ्यायचा मोह होऊ शकतो, तो टाळायला हवा नाहीतर मुले त्या पैशांकडे जबाबदारी शिकण्याचे माध्यम असे पाहत नाहीत, तर पालक आणि मुलांमधले युद्ध जिंकण्यासाठीचे हत्यार म्हणून वापरायला सुरुवात होते. (कधी तरी 'घ्या हे तुमचे पैसे परत, आता मला खुलासे विचारू नका,' असे मुले म्हणू शकतात.)
- पैसे देणारे आणि घेणारे, हिशोब तपासणारे आणि मान्यता घेणारे असे उतरंडीचे स्वरूप टाळावे, म्हणजे त्यामुळे विश्वासाचे नाते तयार व्हायला मदत होईल.
- पैसे हे जबाबदारी शिकवण्याचे माध्यम म्हणून उपयोगात आणता येऊ शकते लेक्चर देण्यासाठी नाही, नाहीतर तेलही गेले आणि तूपही गेले अशी वेळ येऊ शकते.

आर्थिक साक्षरता हा पैशांकडे बघण्याचा दृष्टिकोनही आहे. एका ऊर्जेच्या बदल्यात मिळणारी दुसरी ऊर्जा. पैसे, संपत्ती याभोवती आनंदाबरोबरच जोडली गेली आहे भीती, आश्वासकतेबरोबरच जोडला गेला आत्मविश्वास. समृद्धीबरोबरच जोडली गेली आहे अनिश्चितता. या अनेक भावनांमधून आपल्याला उद्दामपणा, गर्व चिकटू न देणे हे शिकावे लागते. हे साध्य नसून साधन आहे ही समज प्रयत्नपूर्वक आणावी लागते, मग उदंडतेचे तत्त्व हा पाया ठरतो वारसा हक्काने पुढे देण्यासाठी. पिढ्या न् पिढ्या विकसित करण्यासाठी!

## निवडणुक प्रक्रियेत सर्वसमावेशक दृष्टीकोन ठेवत काम करा

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया मुक्त, निर्भय वातावरणात पार पाडावी- निवडणूक निरिक्षक रविकुमार अरोरा






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने निवडणूकीच्या अनुषंगाने खुप चांगली पूर्वतयारी केली आहे. आपण निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर असुन ही निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या अत्यंत संवेदनशील पणे पार पाडाव्यात. निवडणुक प्रक्रियेत सर्वसमावेशक दृष्टीकोन ठेवत काम करण्याचे निर्देश ३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) रविकुमार अरोरा यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित लोकसभा निवडणूकीच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत श्री अरोरा बोलत होते.

यावेळी ३७- अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (खर्च) शक्ती सिंग, ३८-शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) अजय कुमार बिष्ट, निवडणूक निरीक्षक (खर्च) ममता सिंग, निवडणूक निरीक्षक (पोलीस) एम. व्ही.जया गौरी, जिल्हाधिकारी तथा ३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धाराम सालीमठ, अपर जिल्हाधिकारी तथा ३८-शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राहुल पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री. अरोरा म्हणाले की, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने करावयाची सर्व प्रक्रीयेची पुर्वतयारी खुप चांगल्या प्रकारे केली आहे. परंतू केलेल्या पुर्वतयारीची प्रत्यक्षात योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आपण निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर आहोत, त्यामुळे सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना चांगले प्रशिक्षित करावे. भारत निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा असणे बंधनकारक आहे. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून मतदानाच्या तारखेपर्यंत ती अधिक वाढणार आहे. त्यामुळे मतदारांना उन्हापासून संरक्षणासाठी शेड व्यवस्था, वैद्यकीय उपचार किट, मदत कक्ष पिण्याचे पाणी यासारख्या सुविधा सहायक निवडणूक अधिकारी यांनी आपल्या मतदार संघात आहेत का ? याची खात्री करुन घ्यावी. प्रामुख्याने ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर आवश्यक सोयी सुविधा आहेत का? ज्या मतदान केंद्रावरुन वेबकास्टींग होणार आहे तेथील इंटरनेट सुविधा सुरळीत राहील याची काळजीघ्यावी. तसेच दूरस्थसह इतर सर्व मतदान केंद्राची अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे मार्गाची देखील तपासणी करावी. ज्या ठिकाणी त्रुटी आहेत त्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. सी- व्हिजिल या पवर येणाऱ्या तक्रारीचे तातडीने निवारण होईल याची काळजी घेण्यात यावी. निवडणुकीच्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या परवानग्या सुविधा पमधून देण्यात याव्यात. निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या अनुषंगाने उपलब्ध करून दिलेल्या सर्व पचा पुरेपूर वापर करण्यात यावा. मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर मॉकपोलच्या वेळी पोलिंग एजंटना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात. निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या एफएसटी, एसएसटी,व्हीएसटी या पथकांनी अधिक दक्षपणे काम करण्याच्या सूचनाही यावेळी निवडणूक निरिक्षक (सामान्य) श्री अरोरा यांनी उपस्थित नोडल अधिकाऱ्यांना दिल्या. ३८- शिर्डी मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) अजय कुमार बिष्ट म्हणाले की, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी गठीत विविध पथकांनी अधिक कार्यक्षमपणे काम करावे. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करत ही निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकसंघपणे काम करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. निवडणूक निरीक्षक (खर्च) शक्ती सिंग व ममता सिंग यांनी निवडणूक कालावधीत मतदार संघात प्रसारीत होणाऱ्या राजकीय पेड न्यूज आणि राजकीय पुर्वप्रमाणिकरण न केलेल्या जाहिरातीं, तसेच सोशल मिडीयावरील जाहिरातीवर माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीने (एमसीएमसी) लक्ष ठेवावे. तसेच संशयीत पेडन्युजवरही करडी नजर ठेवत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा प्रत्येक खर्च नोंद होईल यादृष्टीने सर्व पथकांची काम करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. ३८- शिर्डी मतदार संघाच्या निवडणूक निरीक्षक (पोलीस) एम. व्ही. जया गौरी म्हणाल्या की, निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस विभागाने तयारी पुर्ण केली आहे. परंतु जे नियोजन केले आहे, त्याची योग्य अंमलबजावणी करावी. तसेच निवडणुक प्रक्रियेमेध्ये व्यत्यय आणणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. तसेच निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. सर्व प्रथम जिल्हाधिकारी तथा ३७ - अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने दोनही लोकसभा मतदारसंघात करण्यात आलेल्या तयारीची माहिती पॉवर पॉईंटच्या माध्यमातून दिली. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी पोलीस प्रशासनाच्या तयारीची माहिती दिली.या बैठकीस सर्व सहायक निवडणुक अधिकारी, नोडल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, निवडणूक प्रक्रियेशी संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

# महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी भाकप सरसावले

## जिल्हा कौन्सिलच्या बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सूचना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**




भारतीय कम्युनिस्ट पक्षाची जिल्हा कौन्सिलची बैठक जेष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ. श्रीधर आदिक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बुरुडगाव रोड येथील पक्षाच्या जिल्हा कार्यालयात झालेल्या या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे नगर दक्षिणचे उमेदवार निलेश लंके व शिर्डी लोकसभेचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांना सक्रिय पाठिंबा देण्यात आला. तर जनविरोधी सरकारचा पराभव करण्यासाठी भाजप हटाव देश बचावचा नारा देऊन जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या उमेदवारांच्या प्रचारार्थ सूचना करण्यात आल्या.

या बैठकीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ड. सुभाष लांडे, जिल्हा सेक्रेटरी कॉ. ड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसेक्रेटरी कॉ.ड. सुधिर टोकेकर, कॉ. कारभारी उगले, कॉ. बाबा आरगडे, कॉ. लक्ष्मण नवले, कॉ. बापूराव राशिनकर, कॉ. पांडुरंग शिंदे, कॉ. संतोष खोडदे, कॉ. संजय नांगरे, कॉ. सतिश पवार, कॉ. भारती न्यालपेल्ली, कॉ. सुरेश पानसरे, कॉ. प्रताप सहाने आदी उपस्थित होते. कॉ. ड. सुभाष लांडे म्हणाले की, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने या पूर्वीच भारतीय जनता पक्षाचे जनविरोधी सरकारचा पराभव करण्यासाठी भाजप हटाव देश बचाव जनजागरण मोहीम हाती घेतली होती. आयटक कामगार संघटनेच्या वतीने कोल्हापूर ते नागपूर महासंघर्ष यात्रा काढून भाजपच्या कामगार शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध करून ३४ जिल्ह्यातून महासंघर्ष यात्रा काढून नागपूर हिवाळी अधिवेशनावर ६० ते ७० हजार कामगार कर्मचाऱ्यांनी महामोर्चा काढला होता. नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात २०१४ ला दिलेले एक ही आश्वासन पूर्ण झाले नसूम, उलट शेतकरी व कामगार विरोधी धोरण घेऊन कार्पोरेट धार्जिणे धोरणे घेऊन अदानी, अंबानी यांच्या हितासाठी सार्वजनिक उद्योग खाजगी करून महागाई वाढविण्यात आली आहे.

कॉ. ड. बन्सी सातपुते म्हणाले की, दरवर्षी दोन कोटी तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याऐवजी खाजगीकरणामुळे रोजगार गेले आहेत. जीएसटीमुळे शेतकरी व सर्वसामान्यांचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारून शेतकऱ्यांना हमी भाव देण्याचे आश्वासन पाळले नाही, त्यामुळे शेतकरी कायमच कर्जबाजारी झाला आहे. याकडे मोदी सरकारने दुर्लक्ष करून शेती धोक्यात आली आहे. त्याचप्रमाणे लढून मिळवलेले कामगार कायदे रद्द करुन उद्योगपतींना हवे तसे कायद्यांत बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे कामगार असुरक्षित असून, नोकरी टिकविणे कठीण झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कॉ.ड. सुधिर टोकेकर म्हणाले की, कामगार कायदे बदलू पाहणारे भाजप सरकारला कामगार वर्गाने त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी. नवीन कामगार कायदे लागू झाल्यास कामगार वर्गांना बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. भांडवलदारांचे हित साधणारे कायदे असून, हे सरकारच भांडवलदाराचे आहे. हे सरकार उलथविण्याचे काम सर्वसामान्यांना करावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य कामगार व शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आणून त्यांना लोकसभेत पाठविण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष सक्रीय झाले असल्याचे जाहीर करण्यात आले. तर गाव पातळीवरील कार्यकर्त्यांना यावेळी सूचना करण्यात आल्या.

# कोहिनुर परिवाराची ना राधाकृष्ण विखे यांनी घेतली भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकसभेचे महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ आज कापडबाजारातील कोहिनुर या वस्त्रदालनाला पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देऊन कोहिनुर परिवाराला खा सुजय विखेंना मत देऊन निवडून देण्याचे आवाहन केले यावेळी संचालक अश्विन गांधी,मॅनेजर योगेश गांधी,रवींद्र भळगट , महेश बोगा,अशोक शेंडे,रमेश गुज्जा ,अशोक दिवटे सह कोहिनुर परिवारातील कर्मचारी कामगार यासह महायुतीचे पदाधिकारी अभय आगरकर,वसंत लोढा,बाबासाहेब वाकळे ,सचिन पारखी आदीं उपस्थित होता

यावेळी अनेक श्री गांधी यांनी कै प्रदीप शेठ गांधी यांच्या मागील निवडणुकीच्या आठवणी सांगितल्या व आपले मनोगते व्यक्त केली ,ना विखे नी मनोगत व्यक्त करून खा सुजय विखेंना निवडून देण्याचे आवाहन केले.

# गुरु शिष्यांना दिला पालकांनी आनोखा निरोप आणि केले नवागतांचे स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**



जिल्हा परिषद प्राथ. शाळा सारोळा स्टेशन येथे पालकांच्या उपस्थितीत इयत्ता पाहिली प्रवेशोत्सव मेळावा, इयत्ता चौथी च्या मुलांना निरोप देण्यात आला.महिलांनी इयत्ता पहिली प्रवेशीत मुलांचे औक्षण केले .ढोल ताशांच्या गजरात मुलांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.तसेच सारोळा स्टेशन शाळेचे शिक्षक संजय रभाजी काळे आणि अकोळनेर केंद्राचे केंद्रप्रमुख रामदास इंगळे साहेब यांच्या सेवानिवृत्ती निमित्त ग्रामस्थांनी संजय काळे गुरुजी व केंद्रप्रमुख रामदास इंगळे या दोघांचाही सपत्नीक सत्कार केला.

यावेळी पालकांनी व सत्कारमूर्ती रामदास इंगळे व शिक्षक संजय काळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शैक्षणिक सेवेतील मौलिक अनुभव व शाळेसाठी भौतिक सुविधांसाठी पालकांनी केलेल्या मदतीबद्दल समाधान व्यक्त करून गुणवत्ते साठी सतत आग्रही राहिल्याचे नमूद केले . तसेच संजय काळे यांनी पहिली ते चौथी इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट गणवेश भेट म्हणून दिला. यावेळी सृष्टी चांगदेव कडूस, अर्जुन तात्याराम कडूस ,श्रेयश थोरात, स्वरा धामणे या विद्यार्थ्यांनी भाषणे केली

कार्यक्रमास गुरुमाता विमल सर्जेराव धामणे,शाळा व्यव . समितीचे अध्यक्ष बाळासाहेब धामणे, उपाध्यक्ष मनेश धामणे, दत्ता महाराज कडूस, बाळासाहेब धामणे, नानासाहेब पारधे, अविनाश धामणे, शुभांगी काळे, सुकन्या धामणे, स्वाती धामणे ,सोनाली धामणे, मनिषा धामणे, मा .केंद्रप्रमुख आत्माराम धामणे, मा . मुख्या . संजय धामणे, नानासाहेब जाधव, रमेश काळे, अरुण काळे, विजय काळे, सुभाष काळे, विठ्ठल काळे, अनिता कडूस, मनिषा थोरात,तुषार धामणे, स्वप्निल थोरात, बाळासाहेब साळवे ,विजय साळवे साहेब, डॉ . श्रीकांत देशपांडे, मच्छिंद्र काळे, मंगेश धामणे, रघू धामणे, बंडू धामणे, अनिल धामणे, राजू शेख व शाळेचे सर्व पालक, ग्रामस्थ अकोळनेर केंद्रातील सर्व मुख्याध्यापक उपस्थित होते . कार्यक्रम अध्यक्ष माजी केंद्रप्रमुख किशोर हारदे यांनी शाळेने राबवलेल्या विविध उपक्रमांबद्दल कौतुक केले. 'शिक्षकांनी आपले काम प्रामाणिक पणे केले तर त्यांची स्वतःची मुले आपो आप शिकतात. तसेच मंथन राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा१००% निकाल व लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा१००% निकाल आणि मिशन आरंभ जिल्हा परिषद अहमदनगर यापरीक्षेमध्ये यश संपादन केल्याबद्दल मुलांचे प्रमाणपत्र देवून कौतुक केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अनिल कडूस यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभार शाळेच्या शिक्षिका रेश्मा गांगर्डे यांनी केले .

# संपुर्ण देशात केवळ दहा जागा लढवता, अन संसद बंद पाडण्याची भाषा करता ?

## मतदारांनी थापांना बळी पडू नये : विनायक देशमुख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**



सध्या लोकसभेच्या निवडणुकीत अहमदनगर (अहिल्यानगर) लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचा उमेदवार निवडणूक लढवित आहे. या पक्षाने संपूर्ण देशभरात केवळ १० उमेदवार उभे केले आहेत. त्यापैकी किती निवडून येतील हे त्यांचे त्यांनाच माहीत. पण त्यांचा उमेदवार मात्र त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा समोरच संसद बंद पाडण्याची भाषा करतो, हा एक विनोदच म्हणावा लागेल, कुणीतरी त्यांना सांगावे लागेल अरे बाबा,संसद म्हणजे काही ग्रामपंचायत नाही. आले मनात कि पाडली संसद बंद. असे तिथे चालत नाही. संसद बंद पाडण्यासाठी खासदारांची आवश्यक संख्या लागते, अशा खरपूस शब्दात भाजपाचे नेते श्री. विनायक देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाच्या उमेदवाराचा समाचार घेतला.

माजी मंत्री व जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री.शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी आज नगर तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सर्वश्री शिवाजीराव कर्डिले, दिलीप भालसिंग, अक्षय कर्डिले, भाऊसाहेब बोठे व तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, मी १९९२ च्या लोकसभा निवडणुकीपासून या प्रक्रियेत सहभागी आहे. पण मागील ३२ वर्षात या निवडणुकीत प्रचाराचा स्तर अत्यंत खालावलेला असून थापा मारण्याची स्पर्धा सुरू झाली आहे की काय ?, असे वाटते. काही उमेदवारांना तर संसद म्हणजे ग्रामपंचायत आहे की काय असे वाटू लागले आहे. गाव पातळीवर किंवा तालुका पातळीवर थापा मारणे एक वेळ समजू शकते. परंतु लोकसभेच्या २५ लाख मतदारांना थापा मारणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. लोकसभेची निवडणूक सुरू झाली आणि एका उमेदवाराने जाहीर केले की माझा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी राहुल गांधी येणार आहेत. मला काँग्रेसचा ३५ वर्षाचा अनुभव असल्यामुळे या बातमीचे मला जरा आश्चर्यच वाटले. पण असेही वाटले की कदाचित त्या उमेदवाराची राहुल गांधी बरोबर मैत्री असु शकते. त्यामुळे राहुल गांधी कदाचित येतील सुद्धा !!. त्यानंतर काही दिवसांनी त्याच उमेदवाराचे वक्तव्य आले की वाहतुकीला त्रास होईल म्हणून मीच राहुल गांधींना येऊ नका असे म्हटले. मागील ३०-३५ वर्षाच्या राजकारणात नगरच्या जनतेला एवढा बालिशपणा प्रथमच अनुभवायला मिळाला.या पुढील काळात देखील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गटाचा) उमेदवार अजूनही मोठमोठ्या थापा मारण्याची शक्यता आहे. मात्र जनतेने त्यांना स्पष्टपणे विचारायला हवे कि आपण संपुर्ण देशात केवळ दहाच जागा लढवता?. मग तुमच्या या थापा कशा खऱ्या होतील ?. तुमच्या पेक्षा महाराष्ट्रात वंचित बहुजन आघाडी आणि एम.आय.एम. हे पक्ष जास्त जागा लढवीत आहेत. मग तुम्ही दिलेली आश्वासने कशी काय पूर्ण करणार.?

मतदारांनी अशा भुलथापांना बळी न पडता आपल्याला ग्रामपंचायतीचा सरपंच निवडायचं नसून देशाचा पंतप्रधान निवडायचा आहे, याचे भान ठेवावे आणि श्री. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी कमळा समोरील बटन दाबुन खा.डॉ. सुजय विखे पा. यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन श्री. विनायक देशमुख यांनी केले आहे.

# भोकरदन तालुक्यात पाणी टंचाईच्या झळा : टँकर शंभरीपार; अनेक गावे अजूनही तहानलेलीच

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**

भोकरदन तालुक्यात दिवसेंदिवस पाणीटंचाईची दाहकता वाढू लागली आहे. भोकरदन शहराला सध्या ३५ तर तालुक्यात ८३ गावे आणि ४ वाड्यांना ११० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. अद्याप कडक उन्हाळ्याला दीड महिना बाकी आहे. प्रशासन नियोजन करीत असले तरी लोकसभा निवडणुकीच्या कामांमुळे पाणीटंचाई समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

तसेच पूर्णा, गिरजा, जुई, केळना नदीकाठ गावातील नागरिकांना सुध्दा पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

मागच्या पावसाळ्यात कमी पावसामुळे सगळीकडे पाणीपातळी खोल गेली आहे. एकीकडे भूगर्भात कमी होणारी जलाशयाची पातळी, तर दुसरीकडे लहान-मोठे जलस्रोत असलेले नदी, नाले आणि विहिरी कोरड्या पडल्याने भोकरदन तालुक्यातील गावांची तहान भागवण्यासाठी टँकरवरच अवलंबून राहावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मागील वर्षी डिसेंबर अखेरीस टँकर सुरू करण्याची वेळ आली होती. तेव्हापासून टँकरच्या मागणीत भरच पडत आहे. मार्चमध्ये ५० टँकरचा आकडा असताना २४ एप्रिल रोजी हाच आकडा ११० टँकरवर गेला आहे. यामुळे तालुक्यातील दुष्काळाची दाहकता वाढली आहे

भोकरदन तालुक्यातील नागरिकांसाठी आगामी मे व जून महिना कसोटीचा ठरणार असल्याची चिन्हे आहेत. यामुळे तालुक्यात टँकरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांची भटकंती सुरूच आहे. सद्यस्थितीत भोकरदन तालुक्यातील अनेक नागरिकांना टँकरच्या पाण्याचा आधार आहे.

या' गावांना टँकरद्वारे पाणी '



निबोळा, टाकळी भोकरदन, सिपोरा बाजार, देहड, खादगाव, १. गोकुळ, जानेफळ गायकवाड, फत्तेपूर, वरुड, पळसखेडा मुर्तड, कोदा, वजीरखेडा, इब्राहिमपूर, वाडी खुर्द, तपोवन, मासनपूर, कोठा जहागीर, भिवपूर, कुंभारी, बाभूळगाव, जवखेडा ठोंबरी, देऊळगाव कमान, वाडी बु, आडगाव, आन्वा पाडा, कोठा दाभाडी. कल्याणी, वडशेद, नळणी खुर्द, मुठाड, तांदुळवाडी, आलापूर, राजूर, करंजगाव, सिरसगाव मंडप, उमरखेडा, केदारखेडा, मेरखेडा, बामखेडा, तपोवन, माळेगाव, भायडी, विरेगाव, पिंप्री, जोमाळा, गारखेडा, सावखेडा, दावतपूर, नळणी वाडी, वालसा वडाळा, वळणी, आव्हाणा, ठालेवाडी, गणेशवाडी, पळसखेडा पिंपळे, मलकापूर, कठोरा बाजार, वाकडी, कुकडी, कोळगाव, बोरगाव तारु, देऊळगाव कमान, कोदोली, दानापूर कोपर्डा, वालसा खालसा, रेलगाव, कार्लावाडी, गव्हाण संगमेश्वर, मोहळाई, प्रल्हादपूर, दगडवाडी, नांजा बरांजळा साबळे, लतिफपूर, मनापूर, लोणगाव, पेरजापूर, कोठा कोळी या गावांना पाण्याचे टँकर सुरू असून, अजूनही काही गावांनी पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करावे, अशी मागणी केली आहे.

**देहेड या गावत २ टेंकर ने पानी पुरवठा सुरु असला तरी ग्रामपंच्यात च्या ठेप्पल करभाराने गावाला पाणी साठि भटकांति कवरवी लागत आहे ग्रामपंच्यात चे नियोजन शून्य कारभारा मुले पण्या साठि वन वन भटकांति करावी लागत आहे**

**गजानन जधाव (बॉस)**
**सामाजिक कार्यकर्ता देहेड**

# दिनकरराव देशमुख यांच्यामुळे महाविकास आघाडीच्या उमेदवार नागेश पाटील अष्टीकर यांना होणार चांगला फायदा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



हिंगोली लोकसभेसाठी महाविकास आघाडीकडुन उमेदवारी नागेश पाटील आष्टीकर यांना मिळाली असून ऐन निवडणुकीच्या तोंडावरच भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकरराव देशमुख यांनी भाजपाला सोड चिठ्ठी दिल्यानंतर त्यांनी शिवसेना (ठाकरे गटामध्ये )जाहीर प्रवेश केला व हिंगोली लोकसभेसाठी नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रचारार्थ सेनगाव तालुका हा पिंजून काढला नागेश पाटील यांना सेनगाव तालुक्यामधून जास्तीत जास्त मते मिळावी यासाठी कार्यकर्ते व मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचार केल्याने नक्कीच शिवसेना (ठाकरे गट )यांच्या उमेदवाराला दिनकरराव देशमुख यांचा फायदा होणार आहे दिनांक २६ एप्रिल रोजी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये सेनगाव तालुक्यातून नागेश पाटील आष्टीकर यांना सर्वांगीण जास्त मते मिळतील असे नागरिकाकडून बोलले जात आहे,



**लोकनेता न्यूज नेटवर्कः -आष्टी तालुक्यातील वाळूज येथे भैरवनाथ यात्रा निमित्त मा.आ.दरेकर नाना आष्टी पोलीस स्टेशनचे पी.आय संतोष खेतमाळस,सरपंच सुरेश सातपुते,अमोल राजे शिंदे, रघुनाथ शिंदे,संतोष खाडे,प्रवीण खाडे,पत्रकार अण्णासाहेब साबळे,सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख दिसत आहेत.**

# बुध्द आणि धम्मा शिवाय व्यवस्था परिवर्तन होणार नाही-प्रबुद्ध साठे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**




भारतीय संविधानानुसार लोकशाहीचे जीवन मूल्य यशस्वी करायचे असेल तर भारत हा पुन्हा बौद्ध भारत म्हणून विकसित करणे गरजेचे असून त्यानुसार प्रबोधन, संघटन,चळवळ उभी करून बहुजन समाज बौद्ध धम्माचा जनाधार बनवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे,कारण बुध्द आणि धम्मा शिवाय व्यवस्था परिवर्तन होणार नाही असे प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियानाचे प्रमुख व भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रबुद्ध साठे यांनी केले,ते नांदेड येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान मालेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते,त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित व्यवस्था परिवर्तन व आपली जबाबदारी,कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रद्धेय भिक्खू विनय बोधीप्रिय होते,आपल्या भाषणात प्रबुद्ध साठे पुढे म्हणाले येथे जात अस्तित्वात आहे,समाज नाही आणि जात ही सामाजिक परिवर्तनाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे,देव,धर्म, जातीच्या मानसिक गुलामीतून बाहेर पडून मानवी मूल्यावर आधारित,जातीअंतातून माणूस समाज व राष्ट्र निर्माण करणे हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित व्यवस्था परिवर्तन होते, यासाठी बहुजन समाजाने बौद्ध धम्म स्वीकारून घर वापसी करावी तरच प्रस्थापित विषम व्यवस्थेच्या गुलामगिरीतून आपण मुक्त होवू,यासाठी त्याग व इमान देणे ही आपली जबाबदारी आहे असे ही प्रबुद्ध साठे यांनी म्हटले, याप्रसंगी प्राचार्य डॉ संघमित्रा गोणारकर गायकवाड यांचेही व्याख्यान झाले,कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष क्षीरसागर सर,व त्यांची सर्व संयोजन समितीने प्रयत्न केले यावेळी भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे बालाजी गजले व पदाधिकारी यांनी प्रबुद्ध साठे यांचा सत्कार केला

# अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयास स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लिनर भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**




पाचशेपेक्षा अधिक वर्षाचा इतिहास असलेल्या शहराचा ऐतिहासिक ठेवा जतन करणाऱ्या अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्रास श्री गोपाल रामनाथ धूत फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या वतीने स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लिनर भेट देण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी रोटरीच्या अध्यक्षा देविका रेळे, प्रतिभाताई धूत, वैशाली कोलते, सविता काळे , आर्किटेक मिनल काळे, सुजाता वाबळे, संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. रवींद्र साताळकर, अभिरक्षक डॉ. संतोष यादव, कर्मचारी नारायण आव्हाड, आनंद कल्याण, रामदास ससे, गणेश रणसिंग, बापू मोढवे, संतोष दांगडे, कृष्णा धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रतिभाताई धूत म्हणाल्या की, राज्यातील सुसज्य संग्रहालयांपैकी अहमदनगर संग्रहालय हे एक आहे. मोठा ऐतिहासिक ठेवा संग्रहालयात जतन करण्यात आला आहे. शासनाकडून अनुदान न घेता वस्तुसंग्रहालयाचे मोठे कार्य उभे राहिले आहे. या कार्याला अधिक वैभवता प्राप्त करण्यासाठी व हा ऐतिहासिक वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

रोटरीच्या अध्यक्षा देविका रेळे यांनी ऐतिहासिक वस्तू संग्रहालय अहमदनगरची वेगळी ओळख निर्माण करेल. भावी पिढीला आपल्या पूर्वजांचा इतिहास जतन करण्यात आलेल्या ठेव्यातून माहिती होणार असून, रोटरी प्रियदर्शनीच्या माध्यमातून वस्तू संग्रहालयास मदत केली जाणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.डॉ. रवींद्र साताळकर यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन संग्रहालयात ऐतिहासिक वास्तू आधुनिक पद्धतीने मांडण्यात आले असून, त्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरत आहे. सर्वांच्या सहकार्याने संग्राहलय सुसज्ज झाले असल्याचे स्पष्ट केले. आभार डॉ. संतोष यादव यांनी मानले.

# विकसित भारतासाठी महायुतीच्या उमेदवाराला विजयी करा-ना.बनसोडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

मागील १० वर्षात आपल्या देशाची प्रगती ही अतिशय वेगाने झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात विकास झाला. मोठ्या शहरात मेट्रो तर लहान मोठ्या शहरातुन राष्ट्रीय महामार्ग हे मागील १० वर्षाच्या काळात झाले. मागच्या काळात सर्व जाती धर्माला सोबत घेवुन नरेंद्र मोदींनी विकास केला. यापुढे ही विकासाची गंगा अखंडपणे शेवटच्या माणसापर्यंत घेवुन जावून आपल्या देशाला विकसित भारत करण्यासाठी महायुतीला विजयी करा असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी, शिवसेना शिंदे गट, रिपाई आठवले गट, राष्ट्रीय समाज पार्टी, जनस्वराज्य शक्ती पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ महायुतीचे शहरातील बुथ कार्यकर्ते व पदाधिकारी तर लोहारा ता.उदगीर

जि.प. देवर्जन सर्कल व जि.प. लोहारा सर्कल अंतर्गत कार्यकत्यांशी संवाद व बैठकीत बोलत होते. यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी आ.सुधाकर भालेराव, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, प्रा.श्याम डावळे, रामराव बिरादार,महिला जिल्हाध्यक्ष उत्तरा कलबुर्गे, शिवानंद हैबतपुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, बापूराव राठोड, दिलीप गायकवाड, शिवशंकर धुप्पे, उषा रोडगे, बालाजी भोसले, वसंत पाटील, सुरेंद्र अक्कनगिरे, भाजपाचे शहाराध्यक्ष मनोज पुदाले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, भरत चामले, रामराव बिरादार, नवनाथ गायकवाड, विजय निटुरे, बसवराज रोडगे, बालाजी गवारे, रतिकांत



अंबेसंगे, प्रभाकर पाटील, सतिश केंद्रे, वर्षाराणी धावारे, स्वाती वट्टमवार, विकास जाधव, शहाजी पाटील, शफी हाशमी, अनिल मुदाळे, दत्ता पाटील, पप्पु गायकवाड, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना क्रीडा मंत्री संजय बनसोडे हे, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संविधान दिले. ते जोपर्यंत सुर्य - चंद्र आहे तोपर्यंत कोणीही बदलु शकणार नाहीत. विरोधकांना निवडणूक आली की संविधान आठवते त्यामुळे ते मुद्दामहून भाजपाच्या विरोधात संविधान बदलतील अशा खोट्या अफवा पसरवत आहेत. देशाला पुढे घेवुन जाण्यासाठी नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले तर आपले विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होवुन प्रत्येक गाव स्मार्ट होईल आणि प्रत्येक व्यक्तीच्या घरात श्रीमंती आल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी आपण सर्वांनी एकदिलाने काम करुन सुधाकर श्रृंगारे यांना विजयी करावे असे सांगितले. निवडणुकीत अपप्रचार करुन किंवा जाती धर्मावर बोलुन मत मिळत नाहीत तर ती विकासाच्या मुद्द्यावर मत मिळतात मागील १० वर्षात मोदी सरकारने केलेल्या विकास कामावरच त्यांनी 'सबका साथ, सबका विकास' साद्य केला असल्याने या निवडणुकीत मोदीसरकार ४०० पार करणार असल्याचा विश्वास ना.संजय बनसोडे यांनी व्यक्त केला.सुत्रसंचलन माजी जि.प. अध्यक्ष रामचंद्र तिरुके व गणेश गायकवाड यांनी केले. यावेळी शहर व ग्रामीण भागातील बुथ प्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904